# प्रकरण - पाचवे

# गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांचे टीकात्मक मूल्यमापन

## प्रकरण - पाचवे

# गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांचे टीकात्मक मूल्यमापन

महात्मा गौतम बुद्ध हे प्राचीन भारताच्या आध्यात्मिक, सामाजिक आणि राजकीय इतिहासामधील एक अलौकिक, व्यक्तिमत्त्व होते. स्वत: गौतम बुद्ध व त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांनी स्थापन केलेला बुद्ध धम्म आणि धम्मसंघ या तीन गोष्टींचा केवळ भारतावरच नव्हे तर जगातील अनेक देशांवर आज ही प्रभाव आहे. गौतम बुद्धांनी संपूर्ण मानवजातीला दु:खमुक्त करून नवीन ज्ञानप्रकाश देण्यासाठी बौद्ध धम्माची स्थापना केली. गौतम बुद्धांनी आपल्या संपूर्ण धम्मविषयक तत्त्वज्ञानामध्ये शीलाला व सदाचाराला अत्यंत महत्त्व दिले. त्यांची धम्म शिकवण व धम्मसंघ हेच त्यांचे अवतार कार्य ठरले. गौतम बुद्धांनी आपल्या धम्माची मांडणी करताना, तत्कालिन सामाजिक आणि राजकीय गोष्टींचीही महत्त्वपूर्ण चर्चा केली. गौतम बुद्धांनी तत्कालिन वैदिक ग्रंथावर आधारीत असलेल्या समाजव्यवस्थेला विरोध केला. त्यांनी लोकशाही, गणराज्य व्यवस्थेचा पुरस्कार केला. गौतम बुद्धांनी आपल्या राजकीय विचाराद्वारे राजकारणास नीतीचे अधिष्ठान मिळवून दिले. गौतम बुद्धांनी 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' या विचाराद्वारे राज्यकर्त्यांनी राज्यकारभार करावा हा मंत्र घालून दिला. गौतम बुद्धांनी इ.स.पूर्व ६व्या शतकामध्ये मांडलेले हे विचार आजही महत्त्वाचे व प्रस्तुत आहेत.

**गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांचे महत्त्व -**

गौतम बुद्धांनी मांडलेले राजकीय विचार हे प्रामुख्याने समता, न्याय, बंधुता, लोकशाही आणि मानवता या मूल्यांवर आधारीत आहेत. गौतम बुद्धांनी मांडलेल्या राजकीय विचारांनी प्राचीन भारताच्या राजकीय इतिहासामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे व ते विचार आजच्या राजकारणामध्येही महत्त्वाचे ठरणारे आहेत. गौतम बुद्धांनी आपल्या विचारांद्वारे प्रथमच धर्म, नीती आणि राजकारण यांचे परस्पर संबंध स्पष्ट केले व त्यांनी राजकारण हे नीतीवर अधिष्ठीत असावे अशा प्रकारची मांडणी केली. गौतम बुद्धांनी सांगितलेल्या तेसकुण जातक[१] कथेत त्यांचे राजाने नीतीवर आधारीत राज्यकारभार कसा करावा यासंबंधीचे विचार आढळून येतात. तेसकुण जातक कथेत

गौतम बुद्ध अशी मांडणी करतात की, राजाने धर्माने राज्य करावे. त्याने असत्य बोलणे टाळावे कारण खोटे बोलणाऱ्या राजाचे राज्य हे निस्तेज बनते, त्या राज्यात उर्जा राहत नाही. राजाने क्रोधावर विजय मिळवावा. कोणाचीही अकारण चेष्टा करू नये. राजाने क्रोधाला आवर घालावा, त्याने क्षमा, शांती आणि करूणेने लोकांशी पुत्रवत प्रेमाने वागावे. गौतम बुद्धांनी खन्तिवाद[२] जातक व चुल्लधम्मपाल[३] जातकात अति दुष्ट राजा धम्माच्या प्रभावामुळे नाश पावतो असे दाखविले आहे. राजाने 'हास' म्हणजे चेष्टा किंवा परिहास टाळला पाहिजे. त्याने आत्मपरभाव राखून दुसऱ्याचा उपहास करता कामा नये. त्याने सहृदर्य बनून सर्वांचे रक्षण केले पाहिजे. राजाप्रमाणेच त्याच्या दरबारामध्ये असलेले अमात्य, त्याचे इतर सहकारी हे शीलवान, सदाचारी असावेत ते लफंगे, मद्यपी, जुगारी व विनाशकारी प्रवृत्तीचे नसावे. ते चारित्र्यवान असावेत. म्हणजेच राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नीतीने, धर्माने राज्य करावे असे गौतम बुद्ध सांगतात.

गौतम बुद्धांचा चक्रवर्ती राजाची[४] संकल्पना ही मुळातच धम्मावर, नीतीवर आधारलेली दिसून येते. गौतम बुद्ध चक्रवर्ती राजाच्या संकल्पनेद्वारे असे दाखवून देतात की, चक्रवर्ती राजा नीतीने, धर्माने राज्य करणारा असतो. त्यामुळे त्याला प्रजेकडून पुत्रवत व पित्याप्रमाणे वागणूक मिळते. तो धम्माच्या आधारे राज्य करणारा व गौतम बुद्धांनी घालून दिलेल्या पंचशीलांचे पालन करणारा असतो. चक्रवर्ती राजा संपूर्ण जगावर धम्म मार्गाने आपले वर्चस्व प्रस्थापित करतो व त्याद्वारे धम्मास अभिप्रेत असलेला नीतीवान, सदाचारी समाज निर्माण करतो.

गौतम बुद्ध सांगतात की, जर राजा अधार्मिक असेल, दुराचारी असेल तर ते राज्य लयास जाते. राजा जर अधार्मिक बनला तर त्याचे इतर सहकारी आणि पर्यायाने संपूर्ण जनता ही अधार्मिक बनते. नेताच जर अधार्मिक असेल तर त्याच्या मागून जाणारे सर्वचजण चुकतात, अधार्मिक कृत्य करतात असे गौतम बुद्ध राजोवाद[५] आणि गण्डतिण्डूक[६] जातक कथेत सांगतात. गण्डतिण्डूक जातक कथेत गौतम सांगतात की, पूर्वी काम्पिल्य राष्ट्रात पंचाल नावाचा राजा वाईट रीतीने वागून, अधर्माने प्रमत्त होवून

राज्य करीत होता, त्यामुळे त्याचे अमात्य वगैरे सारेच अधार्मिक बनले. लोक कराच्या बोजाने त्रस्त होवून बायका मुलासह अरण्यात जावून राहू लागले. पण नंतर जेव्हा तथागताने त्या राजास राजोपदेश केला तेव्हा तो धर्माने, नीतीने राज्य करू लागला. त्यामुळे त्याचे प्रजाजन सुखी झाले असे गौतम बुद्ध सांगतात.

या ठिकाणी गौतम बुद्ध नीती आणि राजकारण यांचा जवळचा संबंध असल्याचे दाखवून देतात. जर राजनीती नीतीभ्रष्ट, शोषणमूलक निर्माण झाली तर त्या व्यवस्थेमध्ये जनतेचे कल्याण होण्याची सुतरामही शक्यता नसते. त्यामुळे विवेकी माणसाने धर्म, शील आणि सदाचार यालाच राजनीतीचा मूलभुत पाया म्हणून स्वीकारले पाहीजे, असे मत गौतम बुद्ध मांडतात. गौतम बुद्धांनी धम्म, नीती आणि राजकारण या गोष्टींचा मेळ बसविला आणि नग्न सत्तेच्या राजकारणाला विरोध केला. गौतम बुद्धांचे हे विचार आजच्या भ्रष्टाचारी राज्यव्यवस्था, अनितीमान राज्यकर्ते यांना योग्य प्रकारे राज्य करून नीतीमान समाज निर्माण करण्यासाठी जनतेचे कल्याण घडविण्यासाठी मार्गदर्शक आहेत.

**गौतम बुद्धांचा वर्ण व जातीव्यवस्थेला विरोध -**

उत्तर ऋग्वेद काळामध्ये समाजव्यवस्था ही अत्यंत दोषयुक्त बनत चालली होती. समाजावर वैदिक धर्मावर आधारलेल्या यज्ञीय कर्मकांडाचे प्राबल्य निर्माण झाले होते. यज्ञाचे स्वरूप बदलून त्यामध्ये जास्तीत जास्त हिंसा होत होती. त्याचबरोबर तत्कालिन समाज वर्ण व जाती व्यवस्था यामुळे दुभंगला होता. अशा परिस्थितीमध्ये गौतम बुद्धांनी आपल्या विचारांची मांडणी केली. गौतम बुद्धांनी तत्कालिन परिस्थितीचे अवलोकन करून तिला छेद देण्याचा प्रयत्न केला व आपल्या विचारांची मांडणी केली. गौतम बुद्धांनी आपले जे तत्त्वज्ञान मांडले त्यास अवैदिक तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते. गौतम बुद्धांनी आपल्या या अवैदिक तत्त्वज्ञानाच्या आधारे जाती व वर्णव्यवस्थेला विरोध केला. त्यांनी ऋग्वेदातील पुरूषसुक्तानुसार[७] जी वर्ण व जातीव्यवस्था निर्माण झाली होती, तिला विरोध केला. पुरूषसुक्तात ईश्वरीय निर्मित वर्ण व जाती व्यवस्थेचा जो पुढील सिद्धांत होता, ब्रह्माच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, त्याच्या

बाहूतून क्षत्रिय जन्मले, जांघातून वैश्य जन्मले तर पायापासून शूद्र जन्मले. तो त्यांनी नाकारला. व वर्णाची व जातीची निर्मिती ही ईश्वरीय नसून ती मानवनिर्मित आहे असा नवीन सिद्धांत मांडला. अश्वलायन सुत्ताच्या[८] माध्यमातून गौतम बुद्धांनी वर्ण व जातीव्यवस्थेला विरोध केलाच शिवाय ब्राह्मणाच्या वर्चस्वालाही विरोध केला. गौतम बुद्धांनी वर्ण व जातीव्यवस्थेची निर्मिती ही माणसाच्या जन्मावरून नव्हे तर कर्मावरून ठरते हे सिद्ध करून दाखविले.[९] गौतम बुद्धांच्या मते, निसर्गावस्थेमध्ये प्रथम मनुष्य सुखाने राहात होता. त्यांचे शरीर हे दिव्यतेजोमय होते. परंतु इतिहासाच्या विकास घटनाचक्रानुसार मनुष्यांचे तेजस्वी स्वरूप नष्ट झाले व त्यांनी घनस्वरूप माणसाचे रूप धारण केले. प्रथम त्यांची शरीरे ही वायूरूप होती. माणसाने जेव्हा घनत्त्व प्राप्त केले. तेव्हा त्याच्यामध्ये भूक, तहान, प्रेम, लैंगिक वासना निर्माण झाल्या त्यामुळे माणसाने आपल्या या वासना पूर्ण करण्यासाठी घराची निर्मिती केली. माणसाची स्वार्थीवृत्ती जागी झाली तेव्हा तो चोऱ्या करू लागला. रूपवान माणसे कुरूप माणसाचा द्वेष करू लागले. तेव्हा माणसांनी एकत्र येवून आपापसामध्ये आपल्या जीविताचे व शेतीचे संरक्षण करण्यासाठी एका नेत्याची नियुक्ती केली. ही निवड सर्वांच्या समत्तीवर आधारीत होती त्यामुळे त्यास 'महासम्मत' म्हणून ओळखले जात असे. याशिवाय खत्तिय म्हणजे शेताचे रक्षण करणारा आणि राजा म्हणजे धर्माच्या अनुषंगाने प्रजेचे रंजन करणारा म्हणूनही त्यास ओळखले जात असे. खत्तिय हा शब्द पाली असून त्यास संस्कृतमध्ये क्षत्रिय असे म्हणतात. गौतम बुद्धांच्या मते, अशाप्रमाणे प्रथम क्षत्रिय वर्ग निर्माण झाला. नंतर ज्यांना ऐहिक जीवनामध्ये सुख वाटले नाही ते दूर जंगलात गेले व त्यांनी तेथे ग्रंथनिर्मिती करण्यास सुरूवात केली. तो वर्ग ब्राह्मण वर्ग ठरला. नंतर जो वर्ग व्यापार, व धंद्यामध्ये पारंगत झाला तो वैश्य झाला तर लहान-मोठी हस्तकौशल्याची निर्मिती व शिकारी करून उपजिविका करणारा शूद्र वर्ग निर्माण झाला.

गौतम बुद्धांनी अशा प्रकारे समाजामध्ये वर्ण व जातीव्यवस्था निर्माण झाली व मनुष्य आपल्या जातीवरून श्रेष्ठ ठरत नाही तर तो त्याच्या कर्मावरून श्रेष्ठ ठरतो. अशी महत्त्वपूर्ण मांडणी केली. गौतम बुद्धांनी आपल्या क्षत्रिय मंडळाच्या सिद्धांताद्वारे[१०]

ब्राह्मण वर्गापेक्षा क्षत्रिय वर्ग जास्त श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले. वरील सिद्धांताच्याद्वारेच त्यांनी वर्ण व जातीव्यवस्था श्रमविभागणीच्या तत्त्वावर आधारीत असल्याचे दाखवून दिले. गौतम बुद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानाला शील व सदाचारावर अधिष्ठित केले. त्यामुळे एखादी व्यक्ती केवळ ब्राह्मण कुळात जन्मली किंवा क्षत्रिय कुळात अथवा वैश्य किंवा शूद्र कुळात जरी जन्मली तरी ती आपल्या सदाचाराने, उच्च शीलाने ब्राह्मण बनते तर एखादा कुकर्मी ब्राह्मण (जन्मावरून) शूद्र बनतो अशी मांडणी केली. ब्राह्मणत्त्व ही केवळ कोण्या एका वर्गाची मक्तेदारी नसून कोणत्याी वर्गातील मनुष्य आपल्या कर्मावरून श्रेष्ठ-कनिष्ठ बनू शकतो. असे गौतम बुद्धांनी दाखवून दिले.[११]

गौतम बुद्धांनी मृत्यूनंतर मनुष्य मोक्षमार्गास जातो किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर अनिर्णित ठेवले. परंतु; त्यांनी असे दाखवून दिले की, कोणत्याही जातीतील, वर्णातील मनुष्य आपल्या सुकर्मामुळे निर्वाणपदास पोहचू शकतो.[१२] गौतम बुद्धांनी तत्कालिन समाजामध्ये अस्तित्त्वात असलेल्या आत्म व मोक्ष या संकल्पनेस विरोध केला. व स्वत:ची अष्टांगमार्गाच्या तत्त्वावर आधारीत असलेली निब्बाण म्हणजेच निर्वाणाची कल्पना मांडली.[१३] गौतम बुद्धांची निब्बाणाची संकल्पना तत्कालिन अस्तित्त्वात असलेल्या संकल्पनेपेक्षा वेगळी होती. त्यांनी आपल्या निब्बाणाच्या संकल्पनेत आत्म्याच्या मोक्षाऐवजी प्राण्याच्या सुखाला प्राधान्य दिले. त्याचबरोबर जिवंतपणी ह्या सर्व संसारात असताना मिळणारे सुख आणि सदैव प्रज्वलित असणाऱ्या विकारांचा ज्वालावर निग्रह साधणे हे अनुक्रमे तीन मूलभुत असे त्यांच्या निब्बाण संकल्पनेचे आधार होते.[१४] गौतम बुद्धांनी वर्ण व जातीव्यवस्थेला विरोध केला. त्यांनी तत्कालिन समजावरती ब्राह्मणांचे असलेले श्रेष्ठत्त्व व वर्चस्वही नाकारले आणि ब्राह्मण्याची नवी व्याख्या केली. त्यांच्या मते, कोणतीही व्यक्ती ती ब्राह्मण कुळात जन्मली म्हणून ब्राह्मण ठरत नाही. तर ज्या व्यक्तीच्या अंगी उच्च शील आणि प्रज्ञा आहे तोच ब्राह्मण ठरतो. "जो मनुष्य शीलसंपन्न आणि कर्तव्यदक्ष आहे तो ब्राह्मण होय."[१५] ब्राह्मणत्त्व हे जन्मावर अवलंबून नसते तर ते सत्यनिष्ठेवर आधारीत असते असे गौतम बुद्ध सांगतात.

**सामाजिक कराराचा सिद्धांत : गौतम बुद्धांचे एक महत्त्वाचे योगदान -**

गौतम बुद्धांनी प्राचीन भारतामध्ये तत्कालिन वैदिक साहित्यामध्ये अस्तित्त्वात असलेल्या सामाजिक करारांहून अगदी वेगळा असा स्वत:चा सिद्धांत मांडला. गौतम बुद्धांनी आपल्या सामाजिक कराराच्या सिद्धांतामध्ये ईश्वरीय संकल्पनेस छेद दिला व समाजसंस्थेची निर्मिती, राज्यसंस्थेची निर्मिती ही माणसांनी परस्परामध्ये करार करून केली आहे अशी मांडणी केली.[१६] गौतम बुद्धांनी आपल्या या सिद्धांताद्वारे प्रथमच मानवी बुद्धीला आणि त्याच्या कृतीशीलतेला महत्त्व दिले. गौतम बुद्धांच्या मते, मनुष्य प्राणी सदासर्वकाळ किंवा फार दिवस अराजकतेच्या अवस्थेत राहू शकत नाही. तो सतत आपली प्रगती करण्यासाठी प्रयत्नशील असतो व या प्रयत्नातून तो काही वेळा स्वार्थी बनतो व स्वार्थापोटी काही अनिष्ठ, अनैतिक गोष्टी करू लागतो. तेव्हा या स्वार्थाने प्ररित झालेल्या माणसाच्या मनाला लगाम घालण्यासाठी एका सर्वमान्य अधिकारसत्तेची गरज असते व त्यातूनच सामाजिक आणि राजकीयसंस्था उदयास आल्याचे गौतम बुद्धांनी सांगितले. गौतम बुद्ध आपल्या या सिद्धांताद्वारे मानवाच्या सुखाने जगण्याच्या अधिकाराचेही समर्थन करतात. त्याचबरोबर जो कोणी या सुखाच्या आड येत असले त्यास शिक्षा करण्याचा अधिकार ते शासन संस्थेला देतात.[१७]

गौतम बुद्धांच्या सामाजिक करार आणि राज्यसंस्थेच्या निर्मिती कराराचे परिशीलन केल्यास आपल्या असे लक्षात येते की, गौतम बुद्धांनी आपल्या या दोन्ही करारामध्ये लोकशाही तत्त्वाचा स्वीकार केला आहे. त्यांच्या या करारामधून आपल्या असे लक्षात येते की, प्राचीन अवस्थेत मनुष्य अराजकतेच्या अवस्थेत होता व यातून सुटका करून घेण्यासाठी त्यांनी राज्यसंस्था व समाजसंस्थेची निर्मिती केली आहे.[१८] गौतम बुद्धांनी जो सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला तो जगातील पहिला सिद्धांत असावा. व हे गौतम बुद्धांचे प्राचीन भारतीय राजकीय विचारास महत्त्वाचे योगदान आहे.

**लोकशाही व्यवस्थेचा पुरस्कार -**

गौतम बुद्धांच्या सामाजिक करारामधूनच राज्यसंस्थेची निर्मिती झाल्याचे आपणास दिसून येते. गौतम बुद्धांच्या या राज्याच्या उत्पत्तीच्या सिद्धांताचे, त्यांच्या धम्मसंघाच्या कार्यपद्धतीचे व घटनेचे आणि वेळोवेळी केलेल्या उपदेशाचे व जातक कथांचे परिशीलन केल्यास आपल्या असे लक्षात येते की, गौतम बुद्धांनी लोकशाही तत्त्वाचा स्वीकार केला आहे व ते लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या मते, राजाची निवड ही लोकांनी एकत्र येवून सर्वानुमते केली आहे. यामध्ये सर्व लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. राज्यसंस्थेची निर्मिती ही लोकांनी परस्परामध्ये करार करून केली आहे. त्याचबरोबर माणसांनी तिच्या अधिसत्तेला अधिमान्यताही दिलेली आहे. या ठिकाणी असेही दिसून येते की राज्यसंस्था किंवा राजा हे पद ईश्वरीय नाही तर ते मानवाच्या आवश्यकतेतून निर्माण झालेले आहे.[१९]

गौतम बुद्ध हे लोकशाहीचे समर्थक होते हे त्यांच्या धम्मसंघाच्या कार्यपद्धतीवरून व्यवस्थितरीत्या किंवा ठळकपणे दिसून येते. गौतम बुद्धांच्या धम्मसंघाची घटनाच मुळात लोकशाही तत्त्वावर अधिष्ठित होती. धम्मसंघातील सर्व निर्णय हे सर्वानुमते घेतले जात होते. संघाची सुत्रे कोणाही एका व्यक्तीच्या हाती नव्हती.[२०] संघामध्ये एखाद्या गोष्टीवरून मतभेद निर्माण झाले तर ते सामंजस्याच्या तत्त्वानुसार मिटविले जात होते. बौद्ध संघाच्या कामकाजामध्ये प्रत्येक व्यक्ती सहभागी होवून आपली मते मांडत होती. त्याचबरोबर संघाच्या कामासाठी आवश्यक अशी गणपुर्तता केली जात होती. 'संघकम्मांमध्ये' एखाद्या गोष्टीवरून मतभेद झाले तर त्यातून मार्ग काढण्यासाठी स्वतंत्र मतदान पद्धती अस्तित्त्वात होती. मतदानपद्धतीचेही विशिष्ट असे नियम होते. मतदान हे शलाकाच्याद्वारे केले जात होते. व मतदान अधिकाऱ्यास 'सलाकगाहप्पक'[२१] (शलाकाग्राहक) म्हणून संबोधले जात होते. गौतम बुद्धांच्या धम्मसंघाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संघामध्ये समता या तत्त्वाचे पालन केले जात होते. सर्व भिक्खूंना समान अधिकार होते. संघामध्ये कोणत्याही प्रकारचे भेद नव्हते. फक्त लिंगानुसार भिक्खू आणि भिक्खूणी यांचा संघ वेगळा होता[२२] व तोच

एकमेव भेद होता. संघाच्या सभेने दिलेले निर्णय हे सर्वावर बंधनकारक होते. सलाकगाहापक हा अत्यंत प्रामाणिक आणि निष्पक्षपाती असे म्हणूनच धम्माच्या कल्पनेला व दंडकाला बहुमत अनुसरून नसेल तर ते बहुमतही नाकारण्याचा अधिकार अशा सलागाहापकाला होता[२३] असे दिसून येते. शलाकगाहापकाला असलेल्या या अधिकारावरून आपणास भारतीय राज्यघटनेत असलेल्या मूलभूत चौकटीची व तिला धक्का पोहचेल अशी जर कायदेमंडळात बहुमताने जरी कृती केली तर ती नाकारण्याचा न्यायमंडळास असलेल्या अधिकाराची आठवण होते. धम्मसंघाची स्वतंत्र अशी प्रशासकीय व्यवस्था होती व तिला अधिकारही देण्यात आले होते. गौतम बुद्धांच्या धम्मसंघामध्ये जी न्यायव्यवस्था होती ती पूर्णपणे पक्षपातविरहित होती. व ती संकल्पना कालातीत आहे. "बौद्ध धम्मात कायद्याची संकल्पना म्हणजे अंतिम सत्ता एखाद्या मानवी किंवा दैवी शक्ती असणाऱ्या सत्ताधाऱ्याच्या ठायी नव्हती तर ती अंतिम सत्ता धम्मात होती. धम्म म्हणजे सदाचरणाची शाश्वत मूल्ये."[२४] व या संकल्पनेत आजही कोणत्याही समाजाला, कोणताही अडथळा न आणता न्याय देवू शकण्याचे सामर्थ्य आहे. गौतम बुद्धांच्या या धम्मसंघाच्या सर्व कार्याचे मूल्यमापन केले तर असे दिसून येते की, ते लोकशाही गणराज्य व्यवस्थेवर आधारीत होते. तेथील कामकाज बहुमतावर आधारलेल्या लोकशाहीच्या मतदानपद्धतीने चालत होते व गौतम बुद्ध लोकशाहीचे पुरस्कर्ते होते.

स्वत: गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यामध्ये झाला होता. शाक्य गणराज्याचा राज्यकारभार लोकशाहीवर आधारीत होता. तेथे सर्वांच्या मताला समान मूल्य होते. व गौतम बुद्ध हे एके काळी अशा लोकसत्ताक शाक्य संघाचे एक जबाबदार सदस्य होते. गौतम बुद्धांनी शाक्य संघामध्ये जेव्हा शाक्य आणि कोलीय यांच्यामध्ये रोहणी नदीच्या पाणी प्रश्नावरून[२५] युद्ध उभे ठाकले त्यास विरोध केला. परंतु शाक्यांच्या सभेत बहुमत गौतम बुद्धांच्या विरोधात गेले. गौतम बुद्धांनी सैन्यामध्ये सहभागी होण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांना देशत्यागाची शिक्षा ठोठावण्यात आली.

अर्थातच हा निर्णयही सेनापतीने बहुमताच्या जोरावरच घेतला होता. त्यामुळे गौतम बुद्धांनी बहुमतास विरोध केला व संघाने दिलेली शिक्षा मान्य केली व देशत्याग केला.

गौतम बुद्धांनी सांगितलेल्या उलूक[२६] जातक कथेतूनही त्यांचे लोकशाहीबाबतचे विचार प्रकट होतात व जर एखादी व्यक्ती लहान असली तरी ती मोठा विचार करू शकते व तिच्या त्या विचाराला मूल्य असते हे या कथेतून प्रतीत होते. वरील सर्व घटनावरून गौतम बुद्ध हे लोकशाहीचे समर्थक व पुरस्कर्ते असे दिसून येते. शिवाय त्यांनी केवळ लोकशाही तत्त्वाचा पुरस्कारच केला नाही तर, ती आपल्या धम्मसंघाच्या कार्यपद्धतीद्वारे प्रत्यक्ष अंमलात आणली. व धम्मसंघाची घटनाच आणि नियम लोकशाही तत्त्वावर उभारले.

**गौतम बुद्धांनी गणराज्य व्यवस्थेचा पुरस्कार केला -**

गौतम बुद्धांनी ज्याप्रमाणे लोकशाही मूल्याचा पुरस्कार केला त्याप्रमाणेच लोकशाही तत्त्वावर आधारलेल्या गणराज्य व्यवस्थेचाही पुरस्कार केला. गौतम बुद्धांनी आपल्या धम्मसंघाची उभारणी तत्कालिन गणराज्य व्यवस्थेच्या नमुन्यावर आधारीत केलेली होती, असे मत बऱ्याच लेखकांनी व्यक्त केले आहे.[२७] व त्यांच्या धम्मसंघाचा अंतर्गत कारभारही गणराज्यपद्धतीनुसारच चालत होता.[२८] गौतम बुद्धांच्या कालखंडामध्ये प्राचीन भारतात अनेक गणराज्ये अस्तित्त्वात होती. त्यांच्या स्वत:च्या अशा राज्यघटना होत्या व त्या राज्यघटनांनुसार त्यांचा कारभारही चालत असे. मागे आपण पाहिलेच की स्वत: गौतम बुद्धांचा जन्म ही शाक्य गणराज्यामध्ये झाला होता. त्याकाळात प्राचीन भारतात लिच्छिवी, कोलिय, मालव, क्षुद्रक, मोरिय, भग्ग, बुली, पिप्पलीवन इत्यादी गणराज्ये अस्तित्वात होती व या सर्वांचा प्रभाव भगवान गौतम बुद्धांच्या गणराज्यविषयक विचारांवर पडलेला दिसून येतो.

एके दिवशी लिच्छवी गणराज्याच्या प्रमुखांस[२९] उपदेश करताना गौतम बुद्ध गणराज्य व्यवस्था टिकवून ठेवण्याचे सात मार्ग सांगतात ते म्हणजे –

१) आपल्या गणराज्यात वारंवार परिषदा भरवाव्यात.

२) त्या परिषदेमध्ये एकमत असावे व एकमताने कारभार करावा.

३) प्रथम ठरविलेल्या नियमाच्या विरूद्ध दुसरे नियम करू नयेत.

४) आपल्या गणराज्यातील जेष्ठ लोकांविषयी आदर बाळगावा.

५) गणराज्यातील कुलस्त्रिया व कुमारिका यांच्यावर जबरदस्ती करू नये.

६) स्वत:च्या धर्मस्थानांबद्दल किंवा पवित्र स्थानांबद्दल जो व्यय किंवा दानधर्म ठरला त्याच्यात काटछाट करू नये.

७) संताना आपल्या राज्यात सुखासमाधानाने राहता येईल अशी व्यवस्था करावी. शेवटी तथागत गौतम बुद्ध त्यांना असा इशारा देतात की, जोपर्यंत त्यांच्यामध्ये पापांची म्हणजे अधर्माची निर्मिती होणार नाही, तोपर्यंत लिच्छवीवर आक्रमण करण्यास टपलेला अजातशत्रू त्यांचा पराभव करणार नाही.

यावरून असे दिसून येते की, गौतम बुद्ध गणराज्य व्यवस्थेच्या पाठीशी भक्कमपणे उभे होते व ते त्या व्यवस्थेचा पुरस्कार करीत होते. कोणतीही राजकीय व्यवस्था जोपर्यंत ऐक्याच्या पातळीवर ठाम असेल. त्या व्यवस्थेमध्ये सर्व निर्णय एकमताने घेतले जातात, त्यांची योग्यपणे अंमलबजावणी केली जाते, तोपर्यंत ती व्यवस्था स्थिर राहू शकते. त्या राजकीय व्यवस्थेचा कोणीही पराभव करू शकत नाही. असे विचार गौतम बुद्धांनी मांडले परंतु; त्या व्यवस्थेत जेव्हा मतभेद निर्माण होतात. त्या व्यवस्थेत अनैतिक कृत्ये केली जातात, त्यावेळेस मात्र ती व्यवस्था कोसळण्यास, तिचे पतन होण्यास सुरूवात होते. असे गौतम बुद्धांच्या वरील विचारांतून प्रकट होते. त्यामुळे जे राज्यकर्ते असतात, त्यांनी एकमताने निर्णय घ्यावेत, स्त्रियांवर अन्याय न करता त्यांचा आदर करावा, राज्यातील थोरांचा मान राखावा म्हणजेच धम्ममार्गाने राज्य केले तर ती व्यवस्था चिरकाल टिकून राहू शकते.

**गौतम बुद्धांची धम्मविजयाची व चक्रवर्ती राजाची संकल्पना महत्त्वाची -**

गौतम बुद्धांनी जी धम्मविजयाची आणि चक्रवर्ती राजाची संकल्पना मांडली ती महत्त्वाची आहे. गौतम बुद्धांच्या मते, धम्माच्या आधारे संपूर्ण विश्वावर विजय मिळविणारा तथागत आणि धम्माच्याच आधारे संपूर्ण जगावर वर्चस्व प्रस्थापित करणारा चक्रवर्ती सम्राट समान आहेत. ते दोघेही आपल्या धम्माचा प्रसार करण्यासाठी

आणि आपली राजकीय सत्ता प्रस्थापित करण्यासाठी हिंसेचा अथवा बळाचा वापर करीत नाहीत.[३०] धम्माच्या आधारे संपूर्ण विश्वावर धम्मराज्य निर्माण करण्यासाठी दोघेही प्रयत्नशील असतात. गौतम बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तक आणि चक्रवर्ती राजा यांनी तथागताच्या पंचशीलाचा प्रसार करून हे जगच धम्ममय करावे ही कल्पना मांडली परंतु हे करीत असताना, त्यांनी कोणत्याही बळाचा, अमीषाचा अथवा हिंसेचा उपयोग करू नये असे सांगितले.

धम्मचक्र प्रवर्तकाने आपल्या धम्माचा प्रसार हा माणसाची दु:खापासून मुक्तता करून, नैतिक व सदाचरणावर उभारलेला समजा निर्माण करावा. त्याने हे जग नित्य आहे की अनित्य, आत्मा, ईश्वर, परलोक या गोष्टी असतात की नाही याची चर्चा करता, मनुष्याच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाला प्राधान्य दिले पाहिजे.[३१] त्याने आपले विचार बुद्धीच्या व अनुभवाच्या आधारे मांडले पाहिजेत व जगामध्ये शांतता निर्मिती करून आपला दिग्विजय सिद्ध केला पाहिजे. धम्मचक्र प्रवर्तकाने विश्वासंबंधीच्या प्रश्नापेक्षा प्रत्यक्ष आचरणाचा प्रश्न हाच खरा प्रश्न मानून आपल्या धम्मविषयक तत्त्वज्ञानाचा प्रसार साऱ्या जभगर केला पाहिजे.[३२] व तोच त्याचा 'धम्मविजय' असतो.

धम्मचक्र प्रवर्तकाप्रमाणेच चक्रवर्ती राजानेही कोणत्याही हिंसायुक्त बळाचा वापर न करता संपूर्ण विश्व काबीज केले पाहिजे व लोकांना बौद्ध व्यक्तीच्या अंगामध्ये जी तत्त्वे असणे आवश्यक आहे, त्या पंचशीलाच्या मार्गाने, त्यांना वागण्यास भाग पाडले पाहिजे, त्यासाठी त्याने तशी कायदा व सुव्यवस्था निर्माण केली पाहिजे.[३३] चक्रवर्ती राजा स्वत: शीलवान असतो व त्या आधारे तो लोकांना धम्माची शिकवण देतो व त्यांना धम्ममार्गाने जाण्यास प्रवृत्त करतो. चक्रवर्ती राजाने आपल्या राज्यातील सर्व जनता, पशुपक्षी यांच्याबद्दल मनामध्ये करूणा[३४] बाळगली पाहिजे.

अशा प्रकारे गौतम बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तन करून संपूर्ण जग धम्ममय करण्यासाठी निघालेल्या धम्मचक्र प्रवर्तकास व चक्रवर्ती राजास समान लेखले आहे. गौतम बुद्धांचा धम्मचक्र प्रवर्तक व चक्रवर्ती राजा यांचे परीशीलन केले तर आपल्या असे लक्षात येते की, जग हे संपूर्ण विश्वराज्य बनविण्यासाठी या दोन संकल्पना

महत्त्वाच्या आहेत. जो कोणी संपूर्ण विश्वावर वर्चस्व मिळवू पाहतो आहे, त्याने कोणत्याही हिंसेचा, जबरदस्तीचा, अनैतिक मार्गाचा वापर न करता धम्म मार्गानेच विजय संपादन केला पाहिजे. गौतम बुद्धांनी इ.स.पूर्व ६व्या शतकामध्येच विश्वराज्याची संकल्पना मांडली होती हे यावरून सिद्ध होते.

**गौतम बुद्धांनी राजकीय प्रतिकाराचा सिद्धांत मांडला -**

गौतम बुद्धांनी राजकीय प्रतिकाराचा जो सिद्धांत मांडला तो महत्त्वाचा आहे. शाक्य आणि कोलिय यांच्यामध्ये जेव्हा रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून संघर्ष[३५] निर्माण होतो तेव्हा गौतम बुद्ध त्या संघर्षाच्या विरोधात उभे राहतात व ज्या गोष्टी चुकीच्या आहेत. त्यांच्या सविनयाच्या आधारे प्रतिकार केला पाहिजे हे दाखवून देतात. गौतम बुद्धांना कोलियांचय विरूद्ध होणारे युद्ध अमान्य होते. त्यामुळे ते युद्धात सहभागी होण्यास नकार देतात आणि हा नकार देत असतानाच ते बहुमताचे चुकीचे विचार अमान्य करतात व शाक्य संघाच्या शिक्षेचा स्वीकार करून देशत्याग करतात. यावरून असे सिद्ध होते की जरी राज्यसंस्थेने एखादी चुकीची कृती केली तर आपण तिचा विरोधच केला पाहिजे व त्या कृतीस विरोध करीत असतानाच राज्यसंस्था जी शिक्षा देईल ती स्वीकारण्यास आपण सिद्ध असले पाहिजे. कारण राज्यसंस्था ही लोकांच्या इच्चेनुसार निर्माण झालेली असते. तिला लोकांची अधिमान्यता मिळालेली असते. व आपण त्या अधिसत्तेच्या विरोधात सकारात्मक, योग्य कारणासाठी जात असताना तिच्याकडून दिली गेलेली शिक्षा स्वीकारने बंधनकारक समजली पाहीजे. लोकमत हे सर्वात जास्त श्रेष्ठ असते व त्याचा आदर आपण केला पाहिजे परंतु त्याच्या चुकीच्या गोष्टींचा निषेधही सविनयाच्या मार्गाने केला पाहिजे.

**गौतम बुद्धांनी राजकारणाचे महत्त्वाचे नवे प्रतिमान मांडले -**

गौतम बुद्धांनी सांगितलेल्या मघाच्या[३६] उदाहरणात्मक गोष्टींचे आपण मूल्यमापन केले तर आपल्या असे लक्षात येते की, त्यांनी याद्वारे जे राजकारण आणि समाजकारण करू इच्छितात त्यांच्यासाठी राजकारणाचे व समाजकारणाचे नवे आदर्शवत प्रतिमान मांडले आहे. गौतम बुद्ध मघाच्या उदाहरणाद्वारे असे दाखवून देतात

की, ज्यांना समाजाविषयी कळवळा आहे त्यांनी स्वत:पासून परिवर्तन करून जग बदलण्याची दूरदृष्टी ठेवली पाहिजे. माणसाने प्रथम स्वत:स बदलले पाहिजे. माणूस जेव्हा स्वत: मध्ये बदल करतो व त्याद्वारे समाजामध्ये नवीन परिवर्तन करण्यास सुरूवात करतो तेव्हा त्यास प्रथम लोक वेड्यातच काढतात परंतु; जेव्हा हळूहळू लोकांना त्याच्या कार्याची महती कळण्यास सुरूवात होते, तेव्हा सर्वच जण त्याच्या मार्गाचे अनुसरण करतात. परंतु ज्यांना कोणाला राजकारण करायचे आहे. त्याने आपल्या सर्व कृती या सकारात्मकच केल्या पाहिजेत. त्या धम्मावर अधिष्ठित असल्या पाहिजेत ही त्याची पूर्वअट असेल. कारण समाज नेहमी चांगल्याच गोष्टींना पाठिंबा देत असतो तर चुकीच्या गोष्टींचा धिक्कार करीत असतो.

गौतम बुद्धांनी याद्वारे असे ही दाखवून दिले की राजकारण आणि समाजकारण करणाऱ्याने समाज उपयोगी कामे केली पाहिजेत व आपल्या सर्व कृती या धम्माने प्रेरित अशा केल्या पाहिजेत. समाज जरी प्रथम त्यास विरोध करीत असला तरी नंतरच्या कालावधीमध्ये ते सर्वचजण त्याला येवून मिळतात व समाजामध्ये मोठे सकारात्मक परिवर्तन घडून येते. सर्व समाज धम्म मार्गाचा अवलंब करून पंचशीलानुसार वागू लागतो. मात्र आपण स्वत: पासून सुरूवात केली पाहिजे.

**कूटदंत सुत्तातील गौतम बुद्धांची शिकवण -**

दीघनिकाय ग्रंथामध्ये ग्रंथित झालेले गौतम बुद्धांचे कूटदंत सुत्त[३७] सामाजिक आणि राजकीयदृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या द्वारे गौतम बुद्धांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय विचारांची महत्त्वाची मांडणी केली. कूटदंताचा मूळ विषय हा यज्ञयाग आहे परंतु यातूनच गौतम बुद्धांचे यज्ञातील हिंसेविषयीचे मत व विचार तर कळतातच शिवाय, कल्याणकारी राज्यव्यवस्था, राज्यातील शिक्षेची तरतूद, आणि कोणत्याही राजकीय कृतीसाठी लोकांची संमती असणे कसे आवश्यक आहे इत्यादी राजकीय विचारही दिसून येतात.

गौतम बुद्ध कूटदंत ब्राह्मणाला आदर्श यज्ञाचे महत्त्व समजावून सांगताना असा उपदेश करतात की, एके दिवशी महविजित राजाने यज्ञ करण्याचे ठरविले व आपल्या

पुरोहितास यज्ञासाठी आवश्यक असलेली तयारी करण्यास सांगितले परंतु पुरोहिताने त्यास विरोध केला व राजास समजावून सांगितले की, आता सध्या आपल्या राज्याची, राज्यातील लोकांची यज्ञ करण्याची परिस्थिती नाही. ते त्यासाठी कर देवू शकणार नाहीत. कारण राज्यातील जनता चोऱ्या, दरोडे इत्यादी कारणांनी त्रस्त होती. तेव्हा पुरोहित राजास म्हणतो की, महाराज त्या चोरांना पकडून तुरूंगात टाकणे किंवा त्यांना हद्दपार करणे हा त्यावरील अंतिम उपाय नव्हे तर त्यांना राजाने ज्याच्या-त्याच्या गरजेनुसार बी-बियाणे, अन्नधान्य, कर्जे, भांडवल व शासकीय नोकरी देवून राज्यात सुव्यवस्था निर्माण केली पाहिजे. जेव्हा महाविजित राजा पुरोहिताच्या उपदेशानुसार राज्यात ध्येयधोरण राबवितो तेव्हा राज्यात त्याला अनेक चांगले बदल झालेले दिसून येतात. राज्यात आदर्शवत स्थिती निर्माण झालचे दिसून येते.

पुन्हा एके दिवशी महाविजित राजा यज्ञ करण्याविषयी आपला मनोदय राजपुरोहिताजवळ व्यक्त करतो. तेव्हा पुरोहितही या यज्ञास मान्यता देतो. परंतु तत्पुर्वी राजाने आपल्या राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य, आपले अमात्य इत्यादींची परवानगी मिळविण्यास सांगतो. त्यानुसार राजा त्यांची परवानगी मिळवितो आणि यज्ञ करण्यास सुरूवात करतो. तेव्हा सदर यज्ञामध्ये कोणत्याही प्राण्यांची-पक्ष्यांची आहुती न देता केवळ तेल, तूप, लोणी, दही, मध आणि गुळ या पदार्थांचाच वापर करण्यात आला. राजाला भेटण्यासाठी आलेल्या मंडळीकडून राजाने कोणत्याही प्रकारच्या नजराण्याचा स्वीकार केला नाही. तेव्हा त्यांनी त्या नजराण्यातून यज्ञाच्या चारी दिशांना अनाथ, अपंग इत्यादी पिडीतग्रस्तांसाठी दानयज्ञ सुरू केला. धर्मशाळांची उभारणी केली. गौतम बुद्धांनी सांगितलेला हा यज्ञ कूटदंतास पटतो व तो आपल्या यज्ञामध्ये बळी देण्यासाठी आणलेल्या प्राण्यांची – पक्ष्यांची सोडवणूक करतो.

गौतम बुद्धांनी सांगितलेल्या या यज्ञातून आपणास यज्ञामध्ये हिंसा करू नये. यज्ञ हे समाज उपयोगी असावेत अशी शिकवण मिळते. याशिवाय याचा राजकीय दृष्टीने विचार केल्यास असे दिसून येते की, जनता ही सार्वभौम आहे व राज्यसंस्थेने

कोणतीही कृती करताना प्रथम लोकांची संमती मिळविली पाहिजे. कोणत्याही राज्यसंस्थेने लोकहित सर्वप्रथम सर्वोच्च मानून आपली ध्येय धोरणे राबविली पाहिजेत. व त्याद्वारे राज्यात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण केली पाहिजे. राजावर किंवा राज्यसंस्थेवर अंतिम नियंत्रण लोकांचे असते. राज्यसंस्थेने लोकांच्या गरजा लक्षात घेवून राज्यातील जे लोक शेती करू इच्छितात त्यांना शेतीसंबंधी आवश्यक असणारी सर्व अवजारे, बी-बियाणे यांचा पुरवठा करावा. जे लोक उद्योग, व्यापार करू इच्छितात त्यांना भांडवल द्यावे तर जे सरकारी नोकरी करू इच्छितात, त्यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घ्यावे. असे केल्यास राज्यातील सर्व लोक आपापल्या कामामध्ये मग्न राहातात. ते आपापल्या कामातून आपल्यासाठी आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची पूर्तता करता, त्या मिळवितात व त्यामुळे अर्थातच राज्यात कोणत्याही प्रकारची हिंसा, चोऱ्या, दरोडे घडून येत नाहीत. व एक कल्याणकारी आणि आदर्शवत अशी राज्यव्यवस्था निर्माण होते.

गौतम बुद्धांचे शिक्षेच्या संदर्भातील ही महत्त्वाचे विचार आपणास कूटदंत सुत्तामध्ये दिसून येतात. गौतम बुद्ध सांगतात की, राजाने गुन्हेगारला हद्दपार करण्याऐवजी किंवा त्यांना तुरूंगात डांबून ठेवण्यापेक्षा त्यांच्यावर अशी परिस्थिती का ओढावली याचा विचार करून राजाने त्यांना त्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करावेत. व त्यांचे पुनर्वसन करावे. कारण काही जणांना तुरूंगात डांबून किंवा त्यांना हद्दपार करून हा प्रश्न सुटत नाही. तेव्हा त्या समस्येचे मूळ पाहून, त्या समस्येवर इलाज करण्यास गौतम बुद्ध सांगतात. गौतम बुद्धांनी अहिंसा तत्त्वाचा स्वीकार केला. त्यामुळे त्यांनी उपरोक्त ठिकाणी दर्शविलेल्या शिक्षा ही आपणास सौम्य दिसतात ते हिंसेवर आधारलेल्या शिक्षेस विरोध करतात परंतु लिच्छवी सेनापती सिंह यास केलेल्या उपदेशामधून असे दिसून येते की, ते सर्व बाजूने प्रयत्न करून ही जेव्हा धर्मासाठी, नैतिकतेसाठी हिंसा करणे अपरिहार्य ठरते तेव्हा हिंसा केलीच पाहिजे याचे समर्थन करतात.

अशा प्रकारे कूटदंत सुत्ताच्या माध्यमातून आपणास महत्त्वाची समाज उपयोगी, राजकीयदृष्ट्या उपयोगी शिकवण मिळते. गौतम बुद्धांनी कूटदंत सुत्तामध्ये राज्याच्या ध्येयधोरणाविषयी मांडलेले विचार आजही आजच्या राज्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरणारे व उपयोगी आहेत.

गौतम बुद्ध एक धार्मिक सामाजिक आणि राजकीय विचार मांडणारे महान विचारवंत होते. त्यांनी तत्कालिन समाजामध्ये निर्माण झालेल्या वाईट रूढी-परंपरा, अंधश्रद्धा यांना आव्हान दिले व आपल्या बौद्ध धम्माच्याद्वारे त्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्यास सुरूवात केली. गौतम बुद्धांचे हे सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञान आजही जगाला प्रेरणा देणारे, मार्गदर्शक असेच आहे. त्यांनी तत्कालिन समाजव्यवस्था नव्या मूल्यावर अधिष्ठित करण्याचा प्रयत्न केला. गौतम बुद्धांच्या संपूर्ण तत्त्वज्ञानाचे, विचाराचे परिशीलन केले तर आपल्या असे लक्षात येते की, त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानामध्ये कोणत्याही वाईट गोष्टीस, अनैतिकतेस थारा दिला नाही. त्यांनी आपल्या संपूर्ण तत्त्वज्ञानाची मांडणी शील, सदाचार, करूणा, प्रेम, मानवता या गोष्टींवर केली. गौतम बुद्धांनी धर्म, नीती आणि राजकारण यासंबंधी आपले जे विचार मांडले ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी धर्म, नीती आणि राजकारण यांचा मेळ घालून प्रज्ञा, शील, करूणा या तत्त्वावर आधारलेली राज्यव्यवस्था निर्माण करावी असा उपदेश केला व तो आजच्या राजकारणास मार्गदर्शन करणारा व दीपस्तंभाप्रमाणे आहे. प्राचीन भारतीय राजकीय इतिहासाला गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

# संदर्भ ग्रंथ सुची


१) भागवत दुर्गा (संपादिका), 'सिद्धार्थ-जातक', खंड-५वा, वरदा बुक्स, पुणे, १९७८, पान नं. ८१

२) कित्ता — खंड २रा, पान नं.

३) कित्ता — खंड ३रा, पान नं. १४५

४) Ghoshal U. N. - "A History of Indian Political Ideas" Oxford University Press, 1959, Page No. 63

५) कित्ता — १ प्रमाणे, खंड ३रा, पान नं. ९१

६) कित्ता — वरील प्रमाणे, खंड ५वा, पान नं. ७२

७) डॉ. आंबेडकर भिमराव, 'शूद्र पूर्वी कोण होते?', क्षितिज पब्लिकेशन, नागपूर, २००१, पान नं. २१

८) रेगे मे. पुं, 'अश्वलायन सूत्र', नवभारत मासिक, अंक जाने. २०००, पान नं.३०

९) Ghoshal U. N. - "A History of Indian Political Ideas" Oxford University Press, 1959, Page No. 63

१०) कित्ता — वरील प्रमाणे

११) कित्ता — वरील प्रमाणे

१२) डॉ. आंबेडकर भिमराव, 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म', पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, २००३, पान नं. १७९

१३) कित्ता — वरील प्रमाणे

१४) कित्ता — वरील प्रमाणे, पान नं. १८०

१५) कुलकर्णी अनंत — 'धर्मपद'

१६) कित्ता - ४ प्रमाणे

१७) कित्ता - ४ प्रमाणे

१८) कित्ता - ४ प्रमाणे

१९) कित्ता - ४ प्रमाणे

२०) डॉ. डांगे सिन्धू, 'बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८०, पान नं. ५५-५६

२१) कित्ता - वरीलप्रमाणे पान नं. ५९

२२) कित्ता – वरीलप्रमाणे पानं नं. ७०

२३) कित्ता - २१ प्रमाणे

२४) वाघ विलास, 'बौद्ध धम्मात शिक्षेची संकल्पना', सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पान नं. १२

२५) कित्ता – १२ प्रमाणे पान नं.

२६) कित्ता – १ प्रमाणे

२७) मोरखंडीकर रा. शा., 'प्राचीन भारतीय राजनीती', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७६, पान नं. १५३

२८) कित्ता – २० प्रमाणे पान नं. ५६

२९) जोशी लक्ष्मणशास्त्री, 'वैदिक संस्कृतीचा इतिहास', प्रज्ञापाठशाला प्रकाशन, वाई, १९९६, पान नं. ३९१

३०) कित्ता – ९ प्रमाणे - पानं नं. ७८

३१) कित्ता – वरील प्रमाणे

३२) कित्ता – २९ प्रमाणे - पानं नं. ३६१

३३) कित्ता – ९ प्रमाणे

३४) कित्ता – वरील प्रमाणे

३५) कित्ता – १२ प्रमाणे

३६) कोसंबी धर्मानंद, 'बुद्धलीला' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००७, पान नं. ३०